# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती</u>

## <u>भरती प्रकिया २०२२</u>

## <u>पद – सफाईगार</u>

अमरावती जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील **"सफाईगार"** या पदाकरीता सुधारीत वेतन संरचनेत वेतनस्तर <u>एस-१ रुपये १५,०००-४७६००/-</u> व अधिक नियमानुसार देय भत्ते या वेतनश्रेणीत, पात्र उमेदवारांकडून ०५ उमेदवारांची निवडसुची आणि ०५ उमेदवारांची प्रतिक्षासुची अशी एकुण १० उमेदवारांची निवडसुची/प्रतिक्षासुची तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा न्यायालय, अमरावतीचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/amravati वर दिनांक ११/०७/२०२२, दुपारी १२.०० वाजल्यापासुन अर्जाचा नमुना व सुचना उपलब्ध राहिल. जाहिरातीत दिलेल्या नमुन्यातच अर्ज नोंदणीकृत डाक पोच पत्राव्दारे (आर.पी.ए.डी.) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पिड पोस्ट) पोचपावतीसह या कार्यालयास दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जातील.

पुढील तपशिलाकरीता जिल्हा न्यायालय, अमरावती च्या https://districts.ecourts.gov.in/amravati या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी.

**<u>टिप</u> :-** दिव्यांगाकरीता ०१ पद राखीव ठेवण्यात आले असुन ते नजिकच्या काळात भरण्यात येईल.

आदेशानुसार,

( रमेश म. कडू )
**प्रबंधक,**
जिल्हा व सत्र न्यायालय,
**<u>अमरावती</u>**

दिनांक : ११/०७/२०२२

जाहिरात दिनांक :- ११/०७/२०२२
अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक :- २५/०७/२०२२

# जाहिरात

जिल्हा न्यायालय, अमरावती आस्थापनेवरील **"सफाईगार"** या पदाकरिता उमेदवारांची प्रतिक्षा/निवड यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राव्दारे (आर.पी.ए.डी.) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पिड पोस्ट) पोचपावतीसह **"सफाईगार पदाकरिता अर्ज"** असे लिफाफ्यावर लिहुन प्रबंधक, जिल्हा न्यायालय, अमरावती (यानंतर ज्यास संक्षिप्तपणे "जिल्हा न्यायालय" असे संदर्भीत केले आहे.) यांच्याकडे दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

या तारखेनंतर आलेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठवलेले किंवा लिफाफ्यावर **"सफाईगार पदाकरिता अर्ज"** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**सफाईगार :-**

निवड/प्रतिक्षा यादीसाठी सफाईगार पदाची संख्या ०५+०५

**अर्हता :-**

प्रकृतीने सुदृढ असावा.

**वयोमर्यादा :-**

या जाहिरातीच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा. सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा व मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा.

**कामाचे स्वरुप :-**

निवड झालेल्या उमेदवारास जिल्हा न्यायीक विभागांतर्गत कोणत्याही न्यायालयात **"सफाईगार"** या पदावर नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर उमेदवारास न्यायालयाच्या इमारतीतील व निवासस्थानातील प्रसाधनगृहांची, इमारतींची व परिसरांची नियमित स्वच्छता व साफ सफाई करणे, निगा राखणे इत्यादी कर्तव्ये पार पाडावी लागतील. तसेच अशा उमेदवारांना न्यायालयाच्या आवारातील जागेची निगा राखणे कामी

..२..

आवश्यक ती सर्व कामे करावी लागतील. सफाईगार हे पद एकाकी असून, पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असतीलच असे नाही. याबाबतची नोंद घ्यावी.

**वेतनश्रेणी :-**

७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-१ या सुधारित वेतन संरचनेत रुपये १५,०००/- व नियमानुसार देय भत्ते.

**उमेदवारांना सुचना :-**

१. जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या-त्या विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवुनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग /कार्यालय प्रमुखांमार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

२. उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका-यांना / कर्मचा-यांस भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

३. अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाणपत्रांचे नमुने जिल्हा न्यायालय, अमरावतीचे संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/amravati यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे सादर करावीत.

४. उमेदवाराने अन्य कोणतेही प्रमाणपत्र अथवा प्रमाणपत्रांच्या प्रती अर्जास जोडू नयेत.

५. उमेदवाराने त्याचे /तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.

६. उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्यांचे विरुध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली/चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

७. विहित नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

८. निवड समिती योग्य ते निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व अशी तयार केलेली अल्पसुची जिल्हा न्यायालय, अमरावती येथील सुचना फलक व https://districts.ecourts.gov.in/amravati या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

९. अशी अल्पसुची तयार करण्याचे किंवा आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवलेले आहेत.

१०. सफाईगार पदासाठी अल्पसुचीत नमुद उमेदवारांची २० गुणांची चाफल्य व साफसफाई कामाचे मूल्यमापन परिक्षा घेण्यात येईल.

११. सफाईगार पदासाठी चाफल्य व साफसफाई कामाचे मुल्यमापन परिक्षेतील गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१२. उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरीता, परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१३. सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्वाची सुचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

१४. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

**<u>सेवाप्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे असेल.</u>**

१. दिनांक २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्याची अंतिम वेळ राहील.

२. दिनांक १२/०८/२०२२ रोजी निवड समिती योग्य ते निकष लावुन अर्हता / योग्यतेच्या आधारे सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करेल व अशी अल्पसुची जिल्हा न्यायालय, अमरावती येथील सुचना फलकावर व https://districts.ecourts.gov.in/amravati या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

३. दिनांक १२/०८/२०२२ रोजी अल्पसुचीमध्ये नांव असलेल्या उमेदवारांनी दिनांक १६/०८/२०२२ ते दिनांक २६/०८/२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेमध्ये

..४..

शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती, फोटो ओळखपत्र (जसे आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवानाची प्रत इत्यादी), दोन सन्माननीय व्यक्तींनी उमेदवाराचे चारित्र्य चांगले असल्याबाबात दिलेले मुळ दाखले, शासनाने विहीत केलेल्या प्राधिका-याने दिलेला जातीचा दाखला, (जेथे लागु असेल तेथे), कुटुंब लहान असल्याबाबतचे मुळ प्रतिज्ञापत्र (नमुना अ), उमेदवार शासकीय सेवेत असल्यास विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र समक्ष हजर करावे व ओळखपत्र प्राप्त करुन घ्यावे.

४. दिनांक २७/०८/२०२२ ते २८/०८/२०२२ दरम्यान सफाईगार पदासाठी २० गुणांसाठी चाफल्य व साफसफाई परिक्षा सकाळी १०.०० ते दुपारी ०६.०० यावेळेत घेण्यात येईल.

५. दिनांक २९/०८/२०२२ रोजी सफाईगार पदासाठी तोंडी मुलाखती करिता पात्र झालेल्या उमेदवारांची यादी व मुलाखतीचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, अमरावती येथील सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

६. दिनांक ३०/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० पासून जिल्हा न्यायालय, अमरावती येथे तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

**<u>महत्वाच्या सूचना</u> :**

१. "नोंदणी क्रमांक" हा अर्जातील रकाना कार्यालयाव्दारे भरण्यात येईल.

२. अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, अमरावती यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याप्रमाणेच असावा.

३. प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासुन ती फक्त ०२ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

४. ओळखपत्र असल्याशिवाय चाफल्य परिक्षा व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

५. उमेदवाराने स्वत:चा पूर्ण पत्ता पिनकोडसह व भ्रमणध्वनी (असल्यास) लिहीलेला व रु.२५/- चे पोस्टाचे तिकीट चिकटवलेला लिफाफा स्वत:चा पत्ता लिहीलेला आर.पी.ए.डी. च्या पोहोच पावतीसह अर्जासोबत जोडावा.

**आदेशावरुन,**

( रमेश म. कडू ).
**प्रबंधक,**
जिल्हा व सत्र न्यायालय,
**<u>अमरावती</u>**

दिनांक :- ११/०७/२०२२

# अर्जाचा नमुना

## जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती
## सफाईगार पदासाठी अर्ज

| **नोंदणी कमांक**<br>(कार्यालयीन उपयोगा करीता) | | | | | |
|---|---|---|---|---|---|

नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो स्वाक्षरी सहित)

१. अर्जदाराचे नांव :------------- --------------- ----------
(प्रथम नांव) (पित्याचे/आईचे/पतीचे नांव) (आडनांव)

२. संपूर्ण पत्ता पिनकोड क्रमांक सहीत :----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
पिनकोड ---------- भ्रमणध्वनी क्र.------------

३. सेवा योजन कार्यालय नोंदणी क्रमांक (असल्यास) :----------------------

४. लिंग :----------------------

५. उमेदवार शासकीय सेवेत असल्यास, कार्यालयाचा तपशिल :----------------------

कार्यालयाची परवानगी घेतली आहे/नाही :----------------------

६. जात व प्रवर्ग :----------------------

७. जन्म दिनांक : ------ ------ -----
दिवस महिना वर्ष

८. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय : -----वर्षे ----- महिने ----- दिवस

९. उमेदवार अविवाहित /विवाहित : -------------------

१०. शैक्षणिक अर्हता (असल्यास) : -------------------

..२..

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

११. टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक अर्हता (असल्यास)

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शब्द प्रति मिनीट | शासकिय संस्था / मंडळ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१२. सफाईगार कामाचा अनुभव आहे / नाही असल्यास त्याचा तपशिल : ----------------------------------------

१३. इतर कामामध्ये विशेष रुची किंवा अनुभव असल्यास त्याचा तपशिल : ----------------------------------------

१४. उमेदवाराला चारित्र्याचे दाखले दिलेल्या व्यक्तींची नावे व पत्ता : १. ----------------------------------------

२. ----------------------------------------

१५. फौजदारी खटल्यांचा तपशिल (असल्यास) :

| अ.क्र. | प्रलंबित/ निकाली/ प्रस्तावित फौजदारी खटल्याचा क्रमांक | खटल्याची माहिती | निकाल झालेला असल्यास निकाल तारीख |
|---|---|---|---|
| | | | |

मी, याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/करते की, मला शासकिय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी, याव्दारे शपथपूर्वक कथन करतो/करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड/नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणत्याही नोटीस शिवाय समाप्त केली जाईल याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरुन अपात्र ठरविण्यात येईल याचीही मला जाणीव आहे.

दिनांक :- / /२०२२ **अर्जदाराचे नाव व सही**

# नमुना 'अ'

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी, आवेदक/ अर्जदार --------------------------------------- याव्दारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो /करते की/ सांगतो/ सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही. तसेच माझेविरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही.

(आवेदक/ अर्जदार राज्य/ केंद्रशासन कर्मचारी असल्यास)

मी, आवेदक/ अर्जदार --------------------------------------- याव्दारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो /करते की/ सांगतो/ सांगते की, माझेविरुध्द कोणतीही शिस्तभंगाची चौकशी प्रलंबित नाही, किंवा / तसेच मला कोणत्याही शिस्तभंगाच्या चौकशीत दोषी ठरविण्यात आलेले नाही.

मी, आवेदक/ अर्जदार --------------------------------------- याव्दारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो /करते की/ सांगतो/ सांगते की, मला आज दिनांक-------- रोजी ----- अपत्ये आहेत. त्यापैकी ----- इतकी अपत्ये २८ मार्च, २००५ नंतर म्हणजेच दिनांक --------- (त्या अपत्याची जन्मतारीख येथे नमूद करावी), रोजी जन्माला आले आहे.

२८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास, मी निवड प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविला जाउ शकतो /शकते, याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक :- आवेदकाचे नाव व सही

**<u>टिप</u>** :- आवेदक अविवाहीत असल्यास त्याने वरिल प्रतिज्ञापत्रात आवश्यक त्या ठिकाणी 'लागू नाही' असे नमुद करावे.

# नमुना 'ब'

## चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री /श्रीमती/कुमारी ---------------------------------------हे /हया -------------------------------- तालुका ------------जिल्हा ------------------, येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील --------वर्षापासून ओळखतो. त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते /त्या माझे/ माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरहू वर्तणूक /चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे/ दिले आहे.

स्थळ :-

दिनांक :-

प्रमाणपत्र देणा-याचे नाव व सही

पत्ता : --------------------

--------------------

--------------------

भ्रमणध्वनी कमांक :-

# सेवाप्रवेश कमसुची

| अ.क. | दिनांक | प्रकिया |
|---|---|---|
| ०१ | ११/०७/२०२२ | स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी करणे. |
| ०२ | २५/०७/२०२२ | दिनांक **२५/०७/२०२२** रोजी सायंकाळी **०५.००** पर्यंत प्राप्त झालेले अर्जच विचारात घेतले जातील. |
| ०३ | २६/०७/२०२२ ते ११/०८/२०२२ | अर्जाची छाननी करणे. |
| ०४ | १२/०८/२०२२ | छाननी करुन सुचीबध्द केलेल्या पात्र उमेदवारांची सुची सुचना फलकावर व संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ०५ | १६/०८/२०२२ ते २६/०८/२०२२ | छाननी होऊन सुचिबध्द झालेल्या उमेदवारांनी जाहिराती मधील नमुद कागदपत्रांच्या प्रती व्यक्तिश: न्यायालयात आणुन द्याव्यात आणि आपले प्रवेश पत्र प्राप्त करुन घ्यावे. |
| ०६ | २७/०८/२०२२ ते २८/०८/२०२२ | छाननी करुन सुचीबध्द केलेल्या उमेदवारांची सफाईगार पदासाठी चाफल्य व साफसफाई परिक्षा घेण्यात येईल. |
| ०७ | २९/०८/२०२२ | चाफल्य परिक्षेचा निकाल जाहिर करणेत येईल. |
| ०८ | ३०/०८/२०२२ पासुन | सफाईगार पदासाठी तोंडी मुलाखत. |

**टिप :- १) उपरोक्त कमसुचिनुसार (वेळापत्रकानुसार) जर कोणत्याही दिवशी वर ठरल्यानुसार कार्यकम (चाचणी/मुलाखत) घेता आला नाही तर तो कार्यकम पुढील दिवशी घेण्यात येईल.**

**२) आवश्यक असल्यास, यातील तारखात, बदल/फेरबदल होण्यास अधिन असतील.**